प्रकरण दुसरे :-

"इचलकरंजीतील यंत्रमाग व्यवसायाची

आर्थिक व सामाजिक रचना"

## -: प्रकरण दुसरे :-

पहिल्या महायुध्दानंतर मुंबईच्या गिरण्यांनी टाकून दिलेले इचलकरंजीने यंत्रमाग इचलकरंजीत आणून या मागणी असलेल्या उद्योगाला पाया दिला. यावेळीच इचलकरंजीतील बहुसंख्य लोकांचा प्रवेश या यंत्रमाग उद्योगामध्ये झाला. इचलकरंजीतील सहकारी चळवळीची भूमिकासुध्दा यंत्रमाग उद्योगात महत्वाची ठरली.[१] इचलकरंजीत उद्योगाच्या वाढीबरोबरच लोकसंख्येत देखील वाढ झाली. कारण व्यवसायाच्या निमित्ताने इचलकरंजीच्या आसपासच्या गांवामधून व इतर राज्यांमधून अनेक लोक इचलकरंजीमध्ये आले व येथे स्थाईक झाले.

### -: तक्ता क्रमांक २ :-

इचलकरंजीची लोकसंख्या - १९०१ - १९८१


| वर्ष | | लोकसंख्या |
|---|---|---|
| १९०१ | .. | १२,९२० |
| १९११ | .. | १०,२३९ |
| १९२१ | .. | १०,२४० |
| १९३१ | .. | ११,९०४ |
| १९४१ | .. | १८,५७४ |
| १९५१ | .. | २७,४२३ |
| १९६१ | ,, | ५०,९७८ |
| १९७१ | .. | ८७,७३१ |
| १९८१ | .. | १,३३,७०४ |

"इचलकरंजीतील औद्योगिक कामगार - एक सामाजिक अभ्यास"या प्रबंधातून.

तक्ता क्र.२ वरुन असे दिसून येते की, १९२१ पासून इचलकरंजीची लोकसंख्या सतत वाढत गेली आहे. १९८१ मध्ये इचलकरंजीची लोकसंख्या १ लाखापेक्षा जास्त झाल्यामुळे इचलकरंजीचा समावेश १ लाख लोकसंख्येच्या शहरांच्या यादीत झाला. एकूण लोकसंख्येपैकी बहुतांश लोकसंख्या यंत्रमाग उद्योगाशी संबंधित आहे. यंत्रमाग उद्योगाचा एक महत्वाचा घटक म्हणून तिचे स्थान अनन्यसाधारण आहे. यंत्रमागाच्या आर्थिक व सामाजिक रचनेचा विचार केला तर या उद्योगातील संबंधित लोकांचा आर्थिक व सामाजिक दर्जा कोणता हे लक्षात घेण्यास मदत होते.

-: तक्ता क्र. ३ :-

यंत्रमाग व्यवसायाची आर्थिक रचना.



तक्ता क्र. ३ वरून आपल्या असे लक्षात येईल की, इचलकरंजीतील यंत्रमाग धंद्यातील खरा सूत्रधार पेढीवाला आहे. पेढीवाला म्हणजे सुताच्या एजंटकडून सूत विकत घेऊन जो छोटया यंत्रमागधारकांना देतो. पेढीवाल्या-प्रमाणेच सूत डेपो किंवा एजंट यांच्याकडून मोठे यंत्रमागधारक (सटवाले) सूत खरेदी करतात. सुताच्या खरेदीनंतर बिमावर घालण्यासाठी सूत सायझींगला पाठविले जाते. तेथून ते परत पेढीवाल्याकडे व मोठया यंत्रमाग-धारकाकडे येते. पेढीवाला छोटया यंत्रमागधारकांकडून कापड विणून घेतो. तर मोठे यंत्रमागधारक आपल्या कारखान्यात कापड विणतात. छोटया यंत्रमागधारकांकडून तयार झालेले कापड पेढीवाल्याकडे येते. पेढीवाला व्यापारी व सटवाले कारखानदार तयार झालेले कापड प्रोसेसला पाठवतात. तेथून ते एजंटला विकले जाते. या एजंटकडून कापड व्यापारी व कापड व्यापा-यापासून अंतीम ग्राहक त्या कापडाची खरेदी करतात.

इचलकरंजी परिसरामध्ये सध्या ४ सूत गिरण्या कार्यरत आहेत. इचलकरंजीच्या यंत्रमाग व्यवसायाची सुताची गरज भागविण्यासाठी या सूत गिरण्यांची प्रामुख्याने निर्मिती झाली होती. परंतु अजूनही प्रत्यक्षपणे सर्व यंत्रमागधारकांना त्याचा फायदा झालेला दिसत नाही. कारण सूतगिरणीचे भागधारक म्हणून येथील व्यापा-यांचे वर्चस्व आहे. इचलकरंजीमध्ये सुताची दलाली केली जाते. सुताचे लिलाव बोलले जातात. त्यामुळे सुताचे दर दररोज बदलत असतात. या सर्व प्रक्रियेवर मारवाडी व्यापा-यांचे वर्चस्व आहे. ते यंत्रमागधारकांना आपल्या मर्जीप्रमाणे वागायला लावतात.

आमच्या पाहणीत असे दिसून आले की, इचलकरंजीमध्ये कापड उद्योगाचा खरा सूत्रधार पेढीवाला आहे. सूत गिरणीतील सूत एजंटांमार्फत

पेढीवाल्याकडे येतो. पेढीवाल्यांचे हाती सर्व मार्केट आहे. कारण सुताचा दर त्यांच्यावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे छोटा यंत्रमागधारकांना ते सूत पुरवितात; व त्या सुताचे कापड विणण्याची मजुरी त्यांना देतात. परंतु कागदोपत्री असे दाखवितात की, सुताची विक्री यंत्रमागधारकांना केली. व त्यांच्याकडून कापड विकत घेतले.

पेढीवाल्यांना इचलकरंजीच्या वस्त्रोद्योगामध्ये महत्वाचे स्थान मिळण्याचे कारण म्हणजे सर्व भारतभर याचे कॉन्ट्रॅक्टस् आहेत. कुठल्या भागात किती व कोणता माल खपतो हे त्यांना माहिती असते. उदा. बंगालमध्ये कमी लांबीची धोतरे खपतात. प्रत्येक प्रांतातल्या धोतरांच्या बॉर्डर्स वेगळया असतात. इतर कापडामध्ये असा फरक नसतो. पांढ-या कापडातलाच कमी-अधिक क्वालिटीचा तो माल असतो. तो रंगवून ब्लाऊज पीससाठी, वायल साडयांसाठी, प्रिंटेड साडयांसाठी वापरला जातो. पेढीवाला या सर्वांना त्यांच्या गरजेप्रमाणे त्या त्या दर्जाचे कापड पुरवितो.

इचलकरंजीच्या वस्त्रोद्योगावर सरकारी धोरणांचा प्रभाव पडतांना दिसतो. इचलकरंजीला सूत पुरवठा प्रामुख्याने तामिळनाडूतील कोईमतूर येथून होतो. तेथे संप झाला की, इचलकरंजीच्या बाजारावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. त्या कालावधीमध्ये सुताचे कापड तयार करण्यापेक्षा त्याचा काळाबाजार करणे परवडते. पेढीवाले तोच धंदा करतात. यामुळे यंत्रमाग बंद ठेवावे लागतात, व मंदी येते. सणावार आल्यानंतर कापडाची मागणी वाढते, व तेजी येते. पेढीवाले तेजी व मंदी या दोन्हींचाही फायदा करून घेतात. कांहीवेळा जरी तोटा झाला तरी तो सोसण्याची आर्थिक ताकद

त्यांच्याजवळ असते. तेजीच्या काळात झालेला तोटा ते भरून काढतात.

या धंद्यातील ही "गुप्त मक्तेदारी" कमी करण्यासाठी व छोटया यंत्रमागधारकाला त्याच्या श्रमाचा पूर्ण लाभ मिळावा यासाठी १९७६ मध्ये "दि महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम्स कार्पोरेशन लि., मुंबई" ही संस्था स्थापन झालेली होती. इचलकरंजीतील तेजी मंदी व्यापाऱ्यांच्या मर्जीवर असू नये हाही एक प्रमुख उद्देश या कार्पोरेशनच्या निर्मितीमागे होता. परंतु कांही लोकांच्या भ्रष्टाचारामुळे ते बंद पडले.[२]

त्यानंतरचा प्रयत्न म्हणजे अलिकडच्या काळात निर्माण झालेली "डेपो सिस्टीम"होय. डेपो सिस्टीम म्हणजे दुसऱ्या राज्यांमध्ये ज्या मोठ-मोठया कांपोझीट मिल्स आहेत. त्यांनी इचलकरंजीमध्ये आपले सूत डेपो उघडले आहेत. त्यातून सुताची विक्री केली जाते.[३]

राजकीय दृष्टीकोनातूनही यंत्रमाग व्यवसायाला पुरेसे प्रतिनिधित्व नाही. इचलकरंजीतील विकेंद्रित व्यवसायाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एकच खासदार आहे. मुंबई, मद्रास, अहमदाबाद येथील गिरण्या मोठया स्वरूपाच्या आहेत. त्या गिरण्यांचे प्रतिनिधी एकत्र येऊन त्यांनी लॉबी तयार केली आहे. त्यांचे अनेक खासदार दिल्लीत असल्यामुळे सरकारचे धोरण आपल्याला अनुकूल राहील असा त्यांचा प्रयत्न चालेला असतो. यंत्रमाग हातमागाशी स्पर्धा करू शकत नाहीत. तसेच मोठया गिरण्यांशीही तो स्पर्धा करू शकत नाही. त्यामुळे येथील कापड मोठया गिरण्या विकत घेतात व आपले शिक्के मारून विकतात. आजचा यंत्रमाग व्यवसाय म्हणजे मोठया गिरण्यांच्या वसाहती झाल्या आहेत.[४]

इचलकरंजीतील यंत्रमाग व्यवसायात दोन प्रकारचे मागधारक दिसून येतात. १] छोटे यंत्रमागधारक [ज्यांचा सट नाही].

२] मोठे यंत्रमागधारक [ज्यांचा सट आहे]

इचलकरंजीतील ८०% यंत्रमागधारक पहिल्या प्रकारात मोडणारे आहेत. त्यांच्या मागांची संख्या १० पेक्षा कमी असते. ते पेढीवाल्यांकडून सूत घेऊन मजूरीवर कापड विणून देतात. त्यांना इचलकरंजीत एका विशिष्ट नांवाने ओळखले जाते. ते म्हणजे "खर्चीवाले मालक". कारण यांच्या मालकीचे जरी यंत्रमाग असले तरी सुताच्या बाबतीत ते पूर्णत: मध्यस्थ्यावर अवलंबून असतात. त्यामुळे जमेच्या बाजूला फारशी रक्कम राहात नाही. खर्चाच्या बाजूलाच जास्त दिसते. म्हणून त्यांना खर्चीवाले मालक असे संबोधले जाते.

आपल्या यंत्रमागावर कामगार म्हणूनही ते काम करतात. तसेच व्यवस्थापनाचे कामही त्यांना पार पाडावे लागते. त्यांच्या घरातील स्त्रियांना कांडया भरण्याचे काम करावे लागते. कांहीवेळा सर्व कुटुंबच यंत्रमाग उद्योगात काम करतांना दिसून येते. कोणी कामगारांनी खाडा केला तर तो कांहीही करू शकत नाही. कारण काम अंगावरचे असते. सूत चांगले असेल तर काम जास्त व चांगले होते. सूत जर कमी प्रतीचे असेलतर ते सारखे तुटते, व काम कमी होते. सूत जर भिजवलेले असेल तर वजन जास्त भरते. त्यामुळे छोटया यंत्रमागधारकांचे नुकसान होते.

दुस-या प्रकारच्या यंत्रमागधारकांचे प्रमाण एकूण यंत्रमाग उद्योगात २०% असले तरी यंत्रमाग व्यवसायाचा विचार करता याचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते. कारण हे यंत्रमागधारक पेढीवाल्यासारख्या मध्यस्थ्यावर अवलंबून नसतात. सूत गिरणीतील सूत एजंटाकडून किंवा सूत डेपोकडून मोठया यंत्रमाग

धारकांना मिळते. या यंत्रमागधारकांच्या उद्योगाचा विस्तार झालेला असतो. आर्थिक दृष्टीने ते स्वावलंबी असतेने यंत्रमाग उद्योगातून मिळणारा पुरेपूर नफा यांच्या पदरात पडू शकतो.

एजंटाकडून मिळालेले सूत बिमावर घालून देण्याचे काम सायझींग व्यवसायाकडून पार पाडले जाते. मोठे यंत्रमागधारक सायझींगशी संपर्क ठेवून हे काम पार पाडतात. तर छोटया यंत्रमागधारकांचा सायझींगशी संबंध येत नाही. पेढीवाल्या व्यापा-यांकडून त्यांना सुताची बिमेच दिली जातात.

यंत्रमाग उद्योगात कामगार या घटकाची महत्वाची भूमिका असते. वस्त्रोद्योगाचा विचार केला तर अनेक प्रकारचे कामगार त्यामध्ये समाविष्ट होत असतात. तरीही प्रस्तुत विषयात यंत्रमागाशी जवळून संबंध असणा-या कामगारांचा विचार करणे महत्वाचे ठरते.

वहीफणी करणारे बाल कामगार :-

सायझींगमध्ये सुताचे बीम तयार होते. परंतु यंत्रमागावर बीम बांधण्यापूर्वी त्याची वहीफणी करावी लागते. वहीफणी म्हणजे बिमावरील प्रत्येक धागा फणीतून पलिकडे घेणे.हे काम वहीफणी करणारे बाल कामगार करतात. या मुलांचे वय ५-६ वर्षापासून १०-१२ वर्षापर्यंत असते. साधारणतः यंत्रमाग कामगारांचीच ही मुले असतात. या कामाचा मोबदला पूर्णपणे या मुलांना मिळत नाही. कारण वहीफणीची सुध्दा एजन्सी असते. वहीफणी करणा-या मुलापेक्षा एजंटानाच त्याचा फायदा कोणतेही काम न करता होत असतो.

कांडी मशीनवर काम करणा-या स्त्री कामगार :-

कांडी मशीनवर बहुसंख्य स्त्रिया काम करतात. बिमातील उभ्या धाग्यांवर आडवे धागे धोटयामुळे विणले जातात. व धोटयात घालण्यासाठी सुताने भरलेली कांडी आवश्यक असते. मोठया कोनावरील सूत कांडीवर उतरविण्यासाठी कांडी मशीन असते. इचलकरंजीत ३००० कांडी कामगार आहेत. त्यातील २५०० स्त्रिया व ५०० लहान मुले आहेत.

वायंडींग मशीनवर काम करणा-या स्त्री कामगार :-

कांडया भरुन कोनांवर राहिलेले सूत व बीम तयार केल्यानंतर कोनांवर राहिलेले सूत नंतर एकत्र करुन त्याचे एक किलो वजनाचे कोन तयार केले जातात. हे काम वायंडींग मशीनवर केले जाते. व प्रामुख्याने त्यामध्ये स्त्रिया काम करतात. ते काम १२-१२ तास करावे लागते.

यंत्रमागावरील कामगार :-

यंत्रमागावर कापड विणण्याचे काम यंत्रमागावरील कामगार करतात. त्यांची पाळी १२ तासांची असते. पाळीमध्ये जेवढे कापड विणून होईल तेवढीच मजूरी त्यास मिळते. १२ तास त्यांना सतत उभे राहूनच काम करावे लागते. सूत चांगले असेल तर जास्त कापड विणून होते. सूत तुटत असल्यास तारा जोडून घ्याव्या लागतात. त्यामुळे कापड कमी विणले जाते. यंत्रमागाला कव्हर नसल्यामुळे धोटा तिरपा घुसला तर सगळे कापड फाटते. त्यामुळे कामगाराचे नुकसान होते. कामगाराला जेंव्हा यंत्रमागाची पूर्णपणे माहिती होते व दुरुस्तीसंबंधीचे कौशल्य येते तेंव्हा त्यास जॉबर असे संबोधले जाते.

त्यासाठी वेगळे प्रशिक्षण घ्यावे लागत नाही.

यंत्रमागावर कापड विणून छोटे मालक ते पेढीवाल्यांना देतात. पेढीवाल्यांकडून प्रोसेसमध्ये ते कापड नेले जाते. तेथे प्रिंटींग, क्लीचिंग, होऊन त्याच्यावरील सर्व प्रक्रिया पूर्ण करुन नंतर ते कापड एजंटाला विकले जाते. एजंटाकडून कापडाचे व्यापारी ते खरेदी करतात. व कापड व्यापा-यापासून अंतीम ग्राहकांकडे ते कापड पोहचते. अशाप्रकारची रचना इचलकरंजीतील यंत्रमाग व्यवसायाची आहे.

--=0=--

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

-: संदर्भ सूचि :-


१. प्रा. अशोक जाधव - "इचलकरंजीतील कामगार चळवळ"
एम्. फिल.साठी लिहिलेला प्रबंध. १९८५.

२. आमदार जयवंतराव आवळे- प्रत्यक्ष मुलाखत. दि. २७ जुलै १९८९

३. श्री.अनिल अवचट - "धागे आडवे उभे"
मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई.

४. श्री. धनपाल टारे - मुलाखत दि. २५ जून १९८९


-=0=-